**नगरपरिषद अधिनियमानुसार मुख्याधिकारी यांनी नगराध्यक्षांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली कामे करण्याबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**परिपत्रक क्र.नपप्रसं/२००५/म.रा.न.प.क.संघ/प्रलंबित मागण्या/प्र.क्र.२३६/२५**
**दिनांक :-२० एप्रिल २००६**

परिपत्रक

०१. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७ मध्ये नगरपालिका प्राधिकारण खालीलप्रमाणे आहेत.

(अ) नगरपालिका
(ब) अध्यक्ष
(क) स्थायी समिती
(ड) विषय समित्या असल्यास त्या आणि
(इ) मुख्य अधिकारी.

सदरचे तरतुदीनुसार नगरपालिका, स्थायी तसेच विषय समिती यांचे बैठकीमध्ये ठराव करणेत येतात. तर अध्यक्ष व मुख्याधिकारी हे पदसिध्द "व्यक्ती" असल्याने त्यांचेमार्फत आदेश काढले जातात.

०२. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ५८ मध्ये नगराध्यक्षांची कार्ये नमूद केली आहेत. त्याचप्रमाणे उक्त अधिनियमातील कलम ७७ मध्ये मुख्य अधिकाऱ्याचे अधिकार आणि कर्तव्य नमूद केली आहेत.

०३. अधिनियमाचे कलम ५८ नुसार अधिनियमाच्या आणि त्या खाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या आणि उपविधीच्या अधीन राहून नगरपालिकेच्या अध्यक्षाने अधिनियमाने दिलेली कार्ये करणेची आहेत. तसेच अधिनियमाचे कलम ७७ नुसार मुख्य अधिकाऱ्याने अध्यक्षांच्या नियंत्रणास, निदेशास व पर्यवेक्षणास अधीन राहून, नगरपरिषदेच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवली पाहिजे आणि या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास दिलेल्या अधिकारांचा वापर केला पाहिजे आणि त्यावर या अधिनियमान्वये किंवा तदनुसार लादण्यात आलेली किंवा त्याजकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

०४. नगरपालिका अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे कर्तव्य याबाबत या कार्यालयाने स्थायी निदेश क्र.१० नुसार सुस्पष्ट निर्देश देणेत आले आहेत. अशा प्रकारे अधिनियमातील उक्त स्पष्ट तरतुदी तसेच स्थायी निदेश क्र.१० नुसार स्पष्ट निर्देश असूनही याबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचेमध्ये संदिग्धता असल्याचे निदर्शनास आले आहे.

०५. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र नगरपरिषद महासंघ मुंबई पदाधिकारी यांजबरोबर झालेल्या दि.१४.२.२००५ चे बैठकीत याबाबत चर्चा होऊन सध्याच्या वैधानिक तरतुदीनुसार मुख्याधिकारी पदासंबंधी स्पष्टता आणणेबाबत निर्णय झाला आहे. त्यानुसार उक्त अनुषंगाने याबाबत स्पष्टता आणणेसाठी खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक निदेश देणेत येत आहे.

०६. महाराष्ट्र नगरप्रपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम तसेच त्या अंतर्गत असलेले नियम, उपविधी, शासन परिपत्रक तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी वेळोवेळी काढलेले स्थायी निर्देश व आदेश तसेच प्रचलित अन्य अधिनियम व शासन नियम यांचे अधिन राहून व उक्त तरतुदीशी विसंगत नसलेले अध्यक्षांमार्फत दिलेले आदेश व नगरपालिका व विषय समिती ठराव यांचे पालन करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.

०७. वरीलप्रमाणे कार्यवाही न केल्यास या बाबींची गंभीर दखल घेणेत येईल व अशा कर्तव्य कुचराईबाबत संबंधीत मुख्याधिकारी शिस्तभंगाचे कारवाईस पात्र राहतील याची नोंद घेणेत यावी.

( सुनील सोनी )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :